## कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो-३ मार्ग

### स्वयंचलित भाडे आकारणी यंत्रणा बनविण्याच्या कामाला निविदाकारांचा उत्तम प्रतिसाद

**मुंबई, जानेवारी, ६, २०१७**- कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो-३ या संपूर्णतः भुयारी मेट्रो प्रकल्पाच्या कामाला गती येण्याच्या दृष्टीने आणखी एक महत्त्वाचे पाऊल मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने (मुं.मे.रे.कॉ) उचलले आहे. मेट्रो-३ च्या स्थानकांकरीता स्वयंचलित भाडे आकारणी यंत्रणा बसविण्याच्या कामाकरिता मागवलेल्या पूर्व अर्हता निविदांवर चर्चा करण्याकरिता नुकतीच मुं.मे.रे.कॉच्या कार्यालयात बैठक पार पडली.

या बैठकीस नामांकीत कंपन्याचे प्रतिनिधी उपस्थित होते. यामध्ये मे.निप्पोन सिग्नल, मे. डाटामॅटीक्स, मे. एल ॲन्ड टी, मे. इंद्रा, मे. थ्री आयईपीएस, मे. असिस इलेक्ट्रॅानिक्स, मे. झेरॉक्स बिझिनेस सर्विसेस, मे. थलेस यांचा समावेश होता.

बैठकीविषयी माहिती देतांना मुं.मे.रे.कॉच्या व्यवस्थापकीय संचालक, श्रीमती अश्विनी भिडे म्हणाल्या की, ''प्रवाशांना सुरक्षित, विश्वसनिय, उच्चप्रतीची व किफायतशीर सेवा देण्यास आम्ही कटीबद्ध आहोत. स्वयंचलित भाडे आकारणी यंत्रणेद्वारे प्रवाशांना रोकडरहीत ग़ेटवे सुविधा मिळणे शक्य होणार आहे''

पूर्व अर्हता निविदा दस्तावेज मुं.मे.रे.कॉच्या www.mmrcl.com या संकेतस्थळावर उपलब्ध असून २,५०० रुपये नापरतावा शुल्क भरुन विकत घेता येईल. पूर्व अर्हता निविदा दिनांक १० फेब्रुवारी, २०१७ पर्यत सादर करता येईल.